# असे असेल नवीन वर्ष!



## आयुष्याला नवे वळण देणारे वर्ष

### कर्क

**नवीन** वर्षाची सुरुवात सप्तमातील शनिमुळे कर्क व्यक्तींच्या आयुष्यात अनेक समस्यांना जन्म देणारी ठरू शकते. मात्र १६ जानेवारीला धनु राशीत येणारा मंगळ आत्मविश्वास उंचावणारा ठरेल; ज्यामुळे अनेक समस्या चुटकीसरशी सुटतील.

एप्रिल महिन्यात ग्रहस्थितीत अनेक बदल होणार आहेत. एप्रिलअखेरीस कुंभेत जाणारा शनि प्रामुख्याने तुमच्या आर्थिक स्थितीवर परिणाम करणारा राहील. जुलैच्या मध्यापर्यंत त्याचा मुक्काम कुंभेतच असणार आहे. त्यामुळे एप्रिल ते ऑगस्ट २२ पर्यंतचा कालावधी फलदायक ठरेल. एप्रिलमध्येच होणारा गुरूबदल परिस्थितीमध्ये आणखी सुधारणा घडवून आणेल. राहूचा राशीबदलही सप्टेंबरपर्यंत चांगली फलिते देणारा राहील. प्रामुख्याने कमाईच्या अनेक संधी उपलब्ध होतील. जून-जुलैमध्ये मेषेतून भ्रमण करणारा मंगळ वैवाहिक जीवनातील समस्या दूर करणारा ठरेल.

कर्क व्यक्ती हळव्या स्वभावाच्या मानल्या जातात. तुमच्यासाठी नाती अधिक महत्त्वाची असतात आणि तुमचे निर्णयही विचारापेक्षा मुख्यत्वे भावनांच्या आधारे घेतले जातात. नवीन वर्षात प्रियजनांकडूनच तुमच्या भावना दुखावल्या जाण्याची शक्यता दिसते आहे. नात्यांबद्दल भ्रमनिरास होईल. त्यामुळे नवीन वर्षात अगदी शून्यातून परत आयुष्य उभे करायला लागणार आहे. आपल्या वागण्याबोलण्याच्या सवयी तपासून पाहण्याची गरज भासेल.

गुरू नवीन विचारांची कास धरण्यासाठी सहाय्यक ठरणार आहे. मात्र रोजचा दिनक्रम, रोजची कामे यात अडथळेही वाढतील; तसेच तब्येतीच्या कुरबुरीदेखील वाढण्याची शक्यता आहे.

नोकरीव्यवसायात जानेवारीत शनिची प्रतिकूलता अधिक जाणवेल. कामाचा बोजा वाढण्याची शक्यता आहे. नातेसंबंधांकडे अधिक काटेकोरपणे पाहण्याची गरज राहील. जानेवारीच्या मध्यावर तब्येतीची काळजी घ्या. आर्थिक बाबतीतही सावध रहा. फेब्रुवारीत तुम्ही प्रामुख्याने घर, कुटुंब आणि वैयक्तिक बाबींमध्ये गुरफटलेले राहाल.

एप्रिलमधील गुरूबदलानंतर घराबरोबरच करिअरमधील प्रगतीला तुमचे प्राधान्य राहील. तरीही ताणतणाव दूर करण्यासाठी या सगळ्यातून दूर कुठेतरी प्रवासाला, सहलीला जाण्याचा विचार अवश्य करा.

मे महिन्यातील बुधाचे वक्री भ्रमण नोकरीव्यवसायात काहीशी पिछेहाट करू शकते. मानसिक अस्वस्थता जाणवेल. मार्च-एप्रिलमध्येही वैयक्तिक आयुष्यातील समस्येमुळे अस्वस्थपणा येण्याचा संभव आहे.

जुलैमध्ये शनि मकरेत येत आहे. गेल्या दोन वर्षात केलेले काम पुढे नेण्याची ही वेळ असेल. या अवधीत मानसिक दडपण कमी होऊन ताणतणाव निवळेल. शारीरिक स्वास्थ्यही रूळावर येऊ लागेल. स्वत:च्या तब्येतीकडे अधिक लक्ष पुरवण्याची ही योग्य वेळ असणार आहे.

ऑक्टोबरमधील मंगळाचे मिथुनेतील भ्रमण तुम्हाला एखाद्या समस्येत, वादात मध्यस्थी करायला लावेल.

वर्षाअखेरीस आयुष्यातील अनावश्यक आणि असंबद्ध गोष्टी दूर करण्यात तुम्ही व्यस्त असाल. आयुष्याची नव्याने घडी बसवण्याने मानसिक स्वास्थ्याबरोबरच शारीरिक स्वास्थ्यही प्राप्त होईल.

**कशी काय तब्येत?**

शनि वर्षभर प्रतिकूल स्थितीत राहणार असल्याने यावर्षी तब्येतीची काळजी घ्यायला लागणार आहे. गुरु वर्षाच्या सुरुवातीला प्रतिकूल असणार आहे. या अवधीत हवेतून पसरणाऱ्या आजारांपासून विशेष सावध रहा. जानेवारीपासून एप्रिलच्या मध्यापर्यंत आहाराबाबत काटेकोर राहणे आणि वेळेवर आरोग्यतपासण्या करून घेणे हिताचे ठरेल. त्यानंतर सप्टेंबर ते नोव्हेंबर हा अवधीही तब्येतीसंबंधी समस्यांनी त्रस्त करणारा राहील. परिणामी वैयक्तिक आयुष्यावर आणि नोकरीव्यवसायावरही परिणाम होण्याची शक्यता आहे.

आर्थिक कारणाने अथवा विरोधकांमुळे मानसिक ताण येऊ न देणे महत्त्वाचे राहील. त्यासाठी योगाभ्यास आणि प्राणायाम उपयोगी ठरेल. वर्षाच्या उत्तरार्धात तब्येत चांगली आणि स्थिर राहील. ग्रहस्थिती मानसिक स्वास्थ्यासाठी अनुकूल राहील.

**घरचं कसं काय?**

कौटुंबिक आघाडीवर वर्ष सर्वसाधारण राहील, मात्र ते अनुकूल काही म्हणता येणार नाही. वर्षाच्या सुरूवातीला मंगळाची प्रतिकूलता नात्यात कडवटपणा आणणारी ठरू शकते. घरातल्या सगळ्यांची तोंडे वेगवेगळ्या दिशेला असल्याने मन खट्टू राहील. कामानिमित्ताने घरातल्यांपासून दूरही जावे लागण्याची शक्यता आहे. संततीची तब्येत, शिक्षण तसेच नोकरीव्यवसायाविषयी चिंता राहील. या सगळ्या चिंता वर्षाच्या उत्तरार्धात दूर होतील. हा अवधी पतप्रतिष्ठा वाढवणारा राहील. सामाजिक कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घ्याल. धाकट्या बहीणभावंडांचे चांगले सहकार्य मिळेल.

वर्ष पुढे सरकेल तसे उत्तरोत्तर नातेसंबंध दृढ होत जातील. त्यासाठी घरातल्यांना वेळ देणे आवश्यक ठरणार आहे. त्यात कामकाजाची लुडबूड होऊ देऊ नका, नाहीतर समस्या वाढतील. घरातील वातावरण बिघडवणाऱ्या चिंता आणि काळज्यापासून दूर राहा.

**वैवाहिक जीवन**

जोडीदाराबरोबरचे नाते जपण्याचे आव्हान या वर्षात तुमच्यापुढे असेल. संयमाने परिस्थिती हाताळली नाहीत तर नात्यात वितुष्ट येण्याची शक्यता आहे. वर्षाचा मध्यावधी वैवाहिक सौख्यासाठी अनुकूल राहील. नात्याची गाडी रूळावर ठेवण्यात तुम्हाला यश आले तर वर्षअखेरीस त्याचे चांगले फलित दिसेल. जोडीदाराबरोबर सामंजस्य राहील. मात्र तिसऱ्या कुणाला तुमच्या वैयक्तिक आयुष्यात ढवळाढवळ करू देऊ नका.

नवविवाहितांना वर्षाच्या उत्तरार्धात गोड बातमी मिळू शकते.

विवाहेच्छुंसाठी वर्षाची सुरुवात उत्तम राहील. कुणाच्या तरी प्रेमात आकंठ बुडाल्याचा अनुभव घेता येईल. जानेवारी ते मार्च दरम्यान तुम्ही आपले प्रेम त्या व्यक्तीपुढे बोलून दाखवाल. होकार मिळण्याचे योग जोरदार आहेत. एप्रिल ते जून हा कालावधी अपेक्षेपेक्षा काहीसा यथातथा राहील. तुम्हाला आणि जोडीदारालाही मनातील भावना व्यक्त करण्यात अडचणी येतील. त्यातून परस्परांमध्ये गैरसमज होण्याची शक्यता आहे. अविश्वास दूर ठेवत मनमोकळा संवाद साधलात तर नाते दृढ करता येईल.

वर्षअखेरीस प्रेमजीवनात परत एकदा संस्मरणीय क्षण अनुभवता येतील.

**नोकरी-व्यवसाय**

शनिचे पाठबळ असल्याने या वर्षात कार्यक्षेत्रात शुभ फलिते मिळतील. करिअरमध्ये लक्षणीय प्रगती होईल. बढतीचे योग आहेत. अतिरिक्त कमाईचा मार्ग सापडेल. नवीन उद्योग सुरू केलात तर त्यात अतिशय सफल व्हाल.

वर्षाच्या सुरूवातीला कामाच्या ठिकाणी काही समस्या येतीलही, पण स्वत:वरचा आणि स्वत:च्या मेहनतीवरचा विश्वास ढळू देऊ नका. जबाबदाऱ्यांमध्येही वाढ होणार आहे. अशावेळी फाजील आत्मविश्वास मात्र टाळा, नाहीतर परिस्थिती अंगलट येऊ शकते.

वर्षाचा मध्यावधी तुलनेने सामान्य आणि चाकोरीबद्ध राहील. वर्षाच्या अखेरीस अव्वल कामगिरी आणि कार्यक्षमतेची उत्तम फलिते मिळतील. स्पर्धापरीक्षा देणाऱ्यांना परीक्षेत चांगली कामगिरी करून दाखवता येईल. सरकारी नोकरीत असणाऱ्यांनी यावर्षी सावधगिरीने वाटचाल करणे आवश्यक आहे.

उद्योगव्यवसाय करणाऱ्यांसाठी या वर्षातील वाटचाल काहीशी कठीण असेल. वर्षाच्या उत्तरार्धात अनुकूलता लाभेल. मात्र त्याचवेळी हितशत्रुंचाही सामना करायला लागणार आहे. तुम्हाला मागे खेचणयचे प्रयत्न त्यांच्याकडून होतील. अनुभव, कौशल्य आणि मनाचा कौल याच्या आधारे चतुराईने व्यवसायाचा गाडा हाकावा लागेल. कठोर मेहनत आणि एकचित्ताने काम करत राहण्याला पर्याय असणार नाही.

नवीन योजनांना सरासरी यश मिळेल. यावर्षी भरघोस कमाईची अपेक्षा करण्यात अर्थ असणार नाही.

**पैशाअडक्याच्या गोष्टी**

वर्षाचा सुरूवातीचा कालावधी काहीसा कठीण असला तरी हे वर्ष पैशाअडक्याच्या दृष्टीने चांगले असणार आहे. उत्पन्नाचे नवे मार्ग खुले होतील. आर्थिक स्थैर्य लाभेल. पूर्वार्धात खर्चात कपात आणि बचत करण्यावर भर देणे हिताचे राहील. वर्षाच्या उत्तरार्धात आर्थिक लाभ होईल. काहींना सरकारी योजनांचा फायदा मिळू शकतो.

यावर्षी तब्येतीच्या समस्यांना सामोरे जावे लागणार असल्याने वैद्यकीय चाचण्या, उपचार यावर खर्च होईल. एप्रिलमधील गुरूबदलानंतर आर्थिकमान उंचावणार आहे.

जुलै ते डिसेंबर या अवधीत बचतीचा आकडा लक्षणीयरीत्या वाढेल. त्यातून तुमच्यासाठी अतिशय उपयुक्त अशी एखादी मोठी खरेदी होईल. वर्षाच्या उत्तरार्धात अनेक मार्गांनी संपत्ती गोळा होईल.

०

**एकंदरीत एप्रिलमधील गुरूबदल कर्क व्यक्तींसाठी अतिशय लाभदायक ठरणार आहे. मात्र त्याआधी ठायीठायी निर्माण होणाऱ्या समस्यांना तोंड द्यायचे आहे. या परीक्षेतून तुम्ही सोन्याप्रमाणे तावूनसुलाखून बाहेर पडाल आणि जगाला तुमची किंमत पटवून देण्यात सफल ठराल यात शंका नाही. भावंडांचे तसेच अन्य कुटुंबियांचे या वाटचालीत चांगले पाठबळ मिळेल. तब्येतीची तेवढी काळजी घ्या.**

**

**ग्रहसंकेत ज्योतिष सल्ला सेवा.**

**(उद्या वाचा पुढील रास)**

## अशी असेल २०२२ ची वाटचाल-

**१ जानेवारी ते १४ एप्रिल - प्रखर कसोटीचा काळ, १०० पैकी २५ गुण.**

**१४ एप्रिल ते २८ जुलै - उत्तम उभारी, ७५ गुण.**

**२८ जुलै ते २३ ऑक्टोबर - थोडी पिछेहाट, ५० गुण.**

**२३ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर - सर्वोत्तम कालावधी, ९० गुण.**

# कणकवली-कोल्हापुर एसटी बस सुरू करण्याची व्यापाऱ्यांची मागणी

■ सिंधुदुर्ग, प्रतिनिधी

**कणकवली-सिंधुदुर्ग** जिल्ह्यातील व्यापार हा कोल्हापूरहून चालत असल्याने कोल्हापूरला ये-जा करण्याकरिता एसटीची सुविधा उपलब्ध नसल्याने जनतेचे हाल होत आहेत. तरी सिंधुदुर्ग-कोल्हापूर नियमित एसटी फेरी सुरू करावी अशी मागणी कणकवलीतील विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी विभाग नियंत्रक यांच्याकडे केली आहे. यावेळी ज्येष्ठ नागरिक सेवा संघाचे दादा कुडतरकर, प्रवासी संघाचे अध्यक्ष मनोहर पालयेकर, निसार शेख, सादिक कुडाळकर, परेश परूळेकर, नितीन तावडे, विनायक मेस्त्री, सायली परुळेकर आदी उपस्थित होते. यासंदर्भात विभाग नियंत्रक यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचे सांगण्यात आले. एसटी कर्मचाऱ्यांचा संप सुरू झाल्यावर दोन महिने उलटून गेले. यामुळे एसटी प्रवासावर अवलंबून असणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशांचे हाल होत आहेत. संपात सहभागी झालेले काही चालक-वाहक कामावर रुजू झाले असल्याने जिल्हा अंतर्गत एसटी वाहतूक सुरू करण्यात आली. खाजगी वाहनातून कोल्हापूरला ये-जा करण्यासाठी सर्व सामान्य जनतेला प्रचंड आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.

# मंगळवारपासून चार दिवस उत्तर भारतात पाऊस कोसळणार

**नवी दिल्ली-** गेल्या काही दिवसांपासून चैन्नईत मुसळधार पाऊस कोसळत असताना येत्या २४ तासांत तामिळनाडू आणि पुद्दुचेरीसह मुसळधार पाऊस पडणार असल्याचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. तसेच ४ ते ७ जानेवारीदरम्यान उत्तर भारतात पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पश्चिम हिमालयीन भागात वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे हवामान बदलत आहे. हे बदल तीन जानेवारीला सुरु राहील. परिणामी मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश, उत्तराखंडच्या वरच्या भागात हलका पाऊस आणि हिमवर्षाव होण्याची शक्यता आहे. ४ ते ७ जानेवारीदरम्यान जम्मू-काश्मिर आणि हिमाचल प्रदेशात पाऊस पडणार असून याशिवाय पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तर राजस्थान आणि पश्चिम उत्तर प्रदेशमध्ये ५ ते ७ जानेवारीदरम्यान पाऊस कोसळणार असल्याचा अंदाज आहे.

# फुफ्फुसांवर परिणाम होत नसल्याने ओमिक्रॉन घातक नसल्याचे उघड

**नवी दिल्ली** - जगभरात अनेक देशांमध्ये कोरोनाच्या ओमिक्रॉन हा व्हेरियंटचा धोका वाढत आहे. त्यामुळे आपल्याला अधिक सतर्क राहण्याची गरज आहे. ओमिक्रॉनचा संसर्ग रोखण्यासाठी विविध निर्बंध लादले जात आहेत. एवढेच नाही तर कोरोनाच्या या नव्या व्हेरिएंटला सामोरे जाण्यासाठी सातत्याने संशोधन करण्यात येत आहे. यातच ओमिक्रॉनसंदर्भात मोठी माहिती समोर आली आहे. वेगाने पसरणारा ओमिक्रॉन हा व्हेरियंट फुफ्फुसांना जास्त लक्ष्य करत नसल्याचे समोर आले आहे. नुकत्याच झालेल्या संशोधनाचा हवाला देत माध्यमांनी ही माहिती दिली आहे. उंदीर आणि इतर लहान जीवांवर केलेल्या संशोधन अभ्यासातून हे दिसून आले आहे.

# पाटण तालुक्यात गव्यांचा उच्छाद! शेतकरी त्रस्त

■ पाटण

**पाटण** तालुक्यातील मणदुरे परिसरात गव्यांचा उपद्रव वाढला आहे. यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. वर्षभर राबून काबाडकष्ट करून वाढवलेली पिके गव्यांकडून फस्त केली जात असल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. वन विभागाने याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून केली जात आहे. मणदुरे भाग हा डोंगर व झाडे-झुडपाचा असल्यामुळे रानडुक्कर, गवे इ. वन्य प्राणी इथे नेहमीच वावरताना आढळतात. या वन्यजीवांना डोंगरांमध्ये पाण्याची सोय नाही. डोंगराच्या पायथ्याला ओढा व नदीचे पाणी असल्यामुळे त्या नजीकच गहू, शाळू, मका, ऊस इत्यादी पिके शेतकरी घेत असतात. दिवसभर जंगलात वावरणारे हे गवे, रात्रीच्या वेळी आपला मोर्चा पिकाकडे वळवतात. अनेक शेतकरी आपल्या पिकाची रात्रभर राखण करतात. परंतु एखाद्या दिवशी राखणीला जाण्यास उशीर झाला तर, हे गवे एका रात्रीत एक एकर ते दीड एकर पिकाचे क्षेत्र फस्त करतात.

# धनकवडीत आईची हत्या करून मुलाने केली आत्महत्या

■ पुणे

**पुण्याच्या** धनकवडी परिसरात बेरोजगारी कंटाळून इंजिनीअर मुलाने जन्मदात्या आईची हत्या केल्यानंतर त्याने स्वतःही गळफास घेऊन आपले जीवन संपल्याने एकच हळहळ व्यक्त होत आहे. त्याने आईला औषधांचा ओव्हरडोस देऊन नंतर तिची दोरीने गळा आवळून हत्या केली.

## बेरोजगारीला वैतागून

निर्मला फरताडे, (७६) असे हत्या झालेल्या महिलेचे नाव आहे. तर गणेश फरताडेने (४२) गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. गणेश फरताडे बेरोजगारीमुळे वैतागला होता. त्याला नैराश्य आले होते. यातूनच त्याने आई निर्मला फरताडे यांना औषधांचा ओव्हरडोस दिला. त्यानंतर बेशुद्धावस्थेत असणाऱ्या आईच्या चेहऱ्यावर प्लॅस्टिक पिशवी घालून हत्या केला. यानंतर स्वतः देखील घराच्या छताला गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. याप्रकरणी गुन्हा सहकारनगर पोलिसांनी दाखल केला असून याबाबत तानाजी सावंतांनी तक्रार दिली आहे.


SBI

भारतीय स्टेट बँक

कॉर्पोरेट सेंटर, स्टेट बँक भवन, मादाम कामा मार्ग, मुंबई - ४०००२१

**सूचना**

भागधारकांच्या हे निदर्शनास आणून दिले जात आहे की एसबीआयच्या रु. १० दर्शनी मूल्याच्या भागाचे रु. १ मध्ये विभाजन झाल्याच्या अनुषंगाने, बँकेद्वारे निर्गमित केलेल्या रु. १० दर्शनी मूल्य असलेल्या भाग प्रमाणपत्रांची वैधता दिनांक २२ नोव्हेंबर २०१४ पासून समाप्त झाली आहे. याविषयीची अधिसूचना भारतीय राजपत्रात दिनांक ०५.११.२०१४ या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली होती. या अनुषंगाने सर्व हेतूंकरिता, या सूचनेत दिले गेलेले भाग तपशील हे रु. १ दर्शनी मूल्य असणाऱ्या भाग प्रमाणपत्रांचे आहेत. याद्वारे सूचना देण्यात येत आहे की बँकेच्या खालील नमूद केलेल्या प्रतिभूतींचे भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) यथायोग्य पूर्ण झालेल्या हस्तांतरण विलेखा (विलेखां) सह / शिवाय, उक्त भाग/ बॉण्डचे यथाविधि नोंदणीकृत धारक/ धारकांकडून हरवली/ गहाळ झाली आहेत आणि त्यांनी त्यांच्या नावे प्रतिलिपी भाग/ बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याकरिता बँकेकडे अर्ज केला आहे. उक्त भाग/ बॉण्डसंबंधी कोणत्याही व्यक्तीचा दावा असल्यास त्यांनी तो दावा बँकेचे ट्रान्स्फर एजंट मेसर्स अलंकित असाईनमेंट्स लिमिटेड, २०५-२०८, अनारकली कॉम्प्लेक्स, झंडेवालन एक्स्टेंशन, नवी दिल्ली - ११००५५ (इमेल आयडी: sbi.igr@alankit.com) यांच्याकडे या दिवसापासून ७ दिवसांच्या आत दाखल करावा, अन्यथा पुढील सूचनेशिवाय बँक प्रतिलिपी भाग बॉण्ड प्रमाणपत्र (प्रमाणपत्रे) निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु करेल.

भारतीय स्टेट बँक

| अनु क्र. | फोलियो क्र. | धारकाचे नाव | समभाग संख्या | प्रमाणपत्र क्रमांक पासून | प्रमाणपत्र क्रमांक पर्यंत | विभिन्न क्रमांक पासून | विभिन्न क्रमांक पर्यंत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ००७६३६८५ | थान सिंह भास्कर | ३० | ४८८२७ | ४८८२७ | ७३८५०८०१८१ | ७३८५०८०२१० |
| २ | ०७१२७४७७ | विद्यावती गुरु | १०० | २३८८५३ | २३८८५३ | ७४६४७५६२११ | ७४६४७५६३१० |
| ३ | ०२२३९६६४ | सुरेश कुमार श्रीवास्तव | ५०० | १८४१९३ | १८४१९३ | ७४३९२२८२३१ | ७४३९२२८७३० |
| ४ | ०७१२७४३७ | पंचमलाल बुडेक<br>गीतांजलि बुडेक | ४०० | २३८८३७ | २३८८३७ | ७४६४७४९०३१ | ७४६४७४९४३० |
| ५ | ००७०४९२५ | सुशील कुमार डिंडा<br>कल्याणी डिंडा | ६०० | २७४२० | २७४२० | ७३७९४६०५७१ | ७३७९४६११७० |
| ६ | ०७५११४६२ | सत्य पाल | १४० | ६३११५१४ | ६३११५१४ | ८०६०३३२५४४ | ८०६०३३२६८३ |
| ७ | ०७५०९७०४ | सुंदर लाल सरण | १४० | ९०४६८५४ | ९०४६८५४ | ८०५९९६००७७ | ८०५९९६०२१६ |
| ८ | ००८३१४८० | रत्नाकर पांडुरंग करपे<br>शारदा रत्नाकर करपे | ६४० | ७५५२१ | ७५५२२ | ७३९१७१४७८१ | ७३९१७१५४२० |
| ९ | ०११२२०७३ | सीताराम अग्रवाल<br>देवेश कुमार अग्रवाल<br>कमला देवी | ५०० | ११७२९५ | ११७२९५ | ७४०४९३१६३१ | ७४०४९३२१३० |
| १० | ०१६०१४७२ | जॉनसन जॉर्ज | ५०० | १४३४७८ | १४३४७८ | ७४१८३४९७७१ | ७४१८३५०२७० |
| ११ | ०७५१८४४३ | डिंपल अग्रवाल | १४० | ६३१८४७७ | ६३१८४७७ | ८०६२०३६०४० | ८०६२०३६१७९ |
| १२ | ०७५१४९६३ | जगदीश चंद्र गुप्ता | १४० | ६३१५००७ | ६३१५००७ | ८०६११११५८० | ८०६१११५७१९ |

**वरील आकडे रु. १/- दर्शनी मूल्याच्या वर्तमान समभागांच्या समभाग विभाजनानंतरचे (अभिलेख तारीख २१.११.२०१४) तपशील दर्शवतात.**

स्थळ: मुंबई
दिनांक: ०३.०१.२०२२

समभागांची संख्या: ३८३०
स.प्रमाणपत्रांची संख्या: १३

महाव्यवस्थापक
(शेअर्स व बॉण्ड्स)



बृहन्मुंबई महानगरपालिका

## १५ ते १८ वर्षे वयोगटासाठी कोविड लसीकरण शुभारंभ

हस्ते
**श्री. आदित्य ठाकरे**
मा. मंत्री, पर्यटन, पर्यावरण, महाराष्ट्र व पालकमंत्री, मुंबई उपनगरे जिल्हा

अध्यक्ष
**श्रीमती किशोरी किशोर पेडणेकर**
मा. महापौर, मुंबई

प्रमुख उपस्थिती
**ॲड. सुहास वाडकर**
मा. उपमहापौर, मुंबई

**डॉ. इकबाल सिंह चहल**
मा. महानगरपालिका आयुक्त, मुंबई



**श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे**
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

दिनांक: सोमवार, ३ जानेवारी २०२२ रोजी
वेळ: सकाळी ११ वाजता

स्थळ: वांद्रे-कुर्ला संकूल समर्पित कोविड आरोग्य केंद्र, वांद्रे-कुर्ला संकूल, वांद्रे (पूर्व)

- १५ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांसाठी विनामूल्य कोविड १९ प्रतिबंधक लसीकरण.
- सोमवार, दिनांक ३ जानेवारी २०२२ पासून मुंबईत ९ केंद्रांवर प्रारंभ.
- लसीकरण केंद्रावर थेट येऊन नोंदणी (onsite/ walk-in) करून लस घेण्याची मुभा.
- केंद्रावर येताना, विद्यार्थ्यांचे आधारकार्ड किंवा शाळांनी दिलेले ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक.
- ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पध्दतीने नोंदणीची सोय.
- सर्व पालकांनी या वयोगटातील पाल्यांना केंद्रावर घेऊन यावे, ही विनंती.
- सन २००७ किंवा त्यापूर्वी जन्म वर्ष असलेले विद्यार्थी लसीकरणासाठी पात्र.
- लसीकरणासाठी कोव्हॅक्सिन लसीचा वापर.
- लसीकरणानंतर ताप येणे, हात दुखणे अशी सौम्य लक्षणे आढळून येऊ शकतात.
- मात्र, घाबरुन जाऊ नये. वैद्यकीय सल्ल्याप्रमाणे औषधे घ्यावीत.
- इतर काही त्रास जाणवल्यास नजीकच्या महानगरपालिका रुग्णालयात संपर्क साधावा.

**समर्पित ९ लसीकरण केंद्रांची यादी व त्यामध्ये समाविष्ट विभागांचा तपशील**

| क्रम | विभाग | लसीकरण केंद्राचे नाव व पत्ता | लसीकरण केंद्राशी संलग्न प्रशासकीय विभाग |
|---|---|---|---|
| १ | ई | रिचर्डसन क्रुडास भायखळा कोविड लसीकरण केंद्र, नागपाडा पोलिस रुग्णालयासमोर, भायखळा | ए, बी, सी, डी, ई |
| २ | एफ/ उत्तर | सोमय्या जम्बो कोविड लसीकरण केंद्र सोमय्या मैदान, शीव (सायन) | एफ/ उत्तर, एल, एम/ पूर्व, एम/पश्चिम |
| ३ | जी/ दक्षिण | एनएससीआय डोम जम्बो कोविड लसीकरण केंद्र, नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया, वरळी | एफ/ दक्षिण, जी/ दक्षिण, जी/ उत्तर |
| ४ | एच/पूर्व | बीकेसी जम्बो कोविड लसीकरण केंद्र, वांद्रे-कुर्ला संकूल | एच/पूर्व, के/ पूर्व, एच/ पश्चिम |
| ५ | पी/दक्षिण | नेस्को जम्बो कोविड लसीकरण केंद्र, गोरेगाव (पूर्व) | के/ पश्चिम, पी/ दक्षिण |
| ६ | पी/उत्तर | मालाड जम्बो कोविड लसीकरण केंद्र, वळनई नाका, मालाड (पश्चिम) | आर/ दक्षिण, पी/ उत्तर |
| ७ | आर/ उत्तर | दहिसर जम्बो कोविड लसीकरण केंद्र, दहिसर चेकनाकाजवळ, दहिसर(पूर्व) | आर/ मध्य, आर/उत्तर |
| ८ | एस | क्रॉम्प्टन ऍण्ड ग्रीव्हस जम्बो कोविड लसीकरण केंद्र, दातार कॉलनी, कांजूरमार्ग (पूर्व) | एन, एस |
| ९ | टी | रिचर्डसन क्रुडास मुलुंड जम्बो कोविड लसीकरण केंद्र, लालबहादूर शास्त्री मार्ग, मुलुंड (पश्चिम) | टी |

**गर्दी टाळा, कोविड प्रतिबंधात्मक नियम पाळा!**

PRO/1910/ADV /2021-22